NRRI-Extension Bulletin No. 11

कोविड–१९

संदर्भात तांदूळ भागधारकांसाठी नियमावली

भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था
कटक–७५३००६, ओडिशा

कोविड–१९ संदर्भात तांदूळ भागधारकांसाठी नियमावली

लेखक

नितीप्रसाद एन. जांभुळकर

जयप्रकाश बिसेन

कविता कुमारी

जी. ए. के. कुमार

दीपंकर मैती

कला

अरुण परीडा

प्रकाशक

निर्देशक

भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था, कटक

भाकृअनुप
ICAR

भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था

कटक–७५३००६, ओडिशा

(आय एस ओ ९००१: २०१५ प्रमाणित संस्था)

सत्यमेव जयते
त्रिलोचन महापात्र, पीएच.डी.
सचिव एवं महानिदेशक
TRILOCHAN MOHAPATRA, Ph.D.
SECRETARY & DIRECTOR GENERAL

भारत सरकार
कृषि अनुसंधान और शिक्षा विभाग एवं
भारतीय कृषि अनुसंधान परिषद
कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, कृषि भवन, नई दिल्ली 110 001
GOVERNMENT OF INDIA
DEPARTMENT OF AGRICULTURAL RESEARCH & EDUCATION
AND
INDIAN COUNCIL OF AGRICULTURAL RESEARCH
MINISTRY OF AGRICULTURE AND FARMERS WELFARE
KRISHI BHAVAN, NEW DELHI 110 001
Tel.: 23382629, 23386711 Fax: 91-11-23384773
E-mail: dg.icar@nic.in

संदेश

कोविड–१९ साथीच्या रोगामुळे अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात परिणाम झाला आहे आणि शेती याला अपवाद नाही. या संकटाच्या वेळी, वाढत्या लोकसंख्येस अन्न पुरविणे ही काळाची गरज आहे. तांदूळ हे भारतातील सर्वात महत्वाचे धान्य आहे आणि देशातील कोट्यावधी शेतकऱ्यांनी पिकविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय खाद्य सुरक्षेमध्ये याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. शेतकरी व मजूर व्यतिरिक्त इनपुट डीलर, लॉजिस्टिक पार्टनर, किरकोळ विक्रेते, वितरक, प्रोसेसर आणि यासारखे बरेच लोक अन्न शेतातून थाळीत आणण्याचा प्रयत्न करतात. तथापि, अत्यंत संक्रमक असल्याने, कोविड –१९ ने कृषी उत्पादन आणि तांदूळ भागधारकांसमोर नवीन आव्हान उभे केले आहे. दाट लोकवस्तीमुळे शहरी भागात आधीच धोका निर्माण झाला आहे आणि विविध शेती व त्यासंबंधित कामांसाठी आवश्यक असणाऱ्या खरेदीसाठी शहरी केंद्रात शेतकरी व्यवहार करतात आणि उत्पादनांचे विपणन करतांना ते कोरोना विषाणूच्या संपर्कात येऊ शकतात. याव्यतिरिक्त, कोविड–१९ च्या लॉकडाऊनमुळे ग्रामीण भागात पुरेशा आरोग्य सुविधांची कमतरता आणि उलट स्थलांतरामुळे त्यांची कोविड –१९ चा संसर्ग होण्याची शक्यता वाढली आहे. अशा अभूतपूर्व परिस्थितीत या भागधारकांचे शेती उत्पादन तसेच आरोग्य आणि उपजीविका राखणे ही चिंताजनक बाब आहे. या संदर्भात भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था, कटक ने देशातील विविध तांदूळ भागधारकांसाठी नियमावली आणली आहे जी शेतीची कामे करीत असताना या भागधारकांना काय करावे आणि काय करू नये याबद्दल मार्गदर्शन करेल.

देशातील तांदूळ भागधारकांसाठी ही नियमावली तयार केल्याबद्दल भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था, कटक (ओडिशा) च्या पुढ़ाकाराचे मी कौतुक करतो. मला विश्वास आहे की देशातील विविध तांदूळ भागधारकांना त्याचा चांगला उपयोग होईल आणि येणाऱ्या हंगामात कोविड–१९ साठी वेळेवर सल्ला देण्यात सरकारला मदत होईल.

(त्रिलोचन महापात्र)

दिनांक ३० जून २०२०
नवी दिल्ली

पार्श्वभूमी

कोविड–१९ मुळे अभूतपूर्व जागतिक लॉकडाउनने जागतिक अर्थव्यवस्थेला केवळ धक्का बसला नाही तर शंका आणि संशयाचे वातावरण देखील निर्माण केले आहे. तथापि, महामारीने पुन्हा कृषि क्षेत्र प्रकाशात आणले आहे. या कालावधीत, शेतीकडे अन्न आणि पौष्टिक सुरक्षेची पूर्तता करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेला पुन्हा सामान्य स्थितीत आणण्यासाठी आशेचा किरण म्हणून पाहिले जात आहे. तांदूळ हा जगातील अन्न आणि पौष्टिक सुरक्षेचा एक महत्वाचा घटक आहे आणि मुख्यतः दक्षिण पूर्व आशियामध्ये लागवड केली जाते. भाताच्या लागवडीमुळे या प्रदेशातील खरीप हंगामाला अत्यंत महत्त्व आहे. या कालावधीत वेगवेगळ्या भागधारकांकडून कित्येक कार्य राबविण्यात येतात. कोविड–१९ च्या घटनेमुळे या भागातील तांदूळ भागधारकांच्या आरोग्यासमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहिली आहेत ज्यामुळे जागतिक अन्नसुरक्षेवर परिणाम होईल.

या पार्श्वभूमीवर, भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था, कटक, (भारत) ने वेगवेगळ्या तांदूळ भागधारकांसाठी नियमावली तयार केली आहे. मला विश्वास आहे की, ही नियमावली तांदळाच्या क्षेत्रात काम करणारे, त्यांच्या कुटुंबाचे आरोग्य चांगले व सुरक्षित ठेवण्यास मदत करेल.

(दीपंकर मैती)
निर्देशक
भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था

प्रस्तावना

कोविड–१९ च्या अभूतपूर्व जागतिक लॉकडाउनमुळे, जेव्हा अर्थव्यवस्थेतील बहुतेक क्षेत्रांमध्ये घसरण दिसून येत आहे, कृषी क्षेत्र संथ गतीने पुढे जात आहे. भारत एक कृषी अर्थव्यवस्थेवर आधारित देश म्हणून ओळखले जाते. तथापि, कृषी क्षेत्रातील विविध भागधारकांना वेगवेगळे कृषीची कार्ये करण्यामुळे कोविड–१९ चा धोका आहे. शेतकऱ्यांना या काळात त्यांच्या घरात निष्क्रिय बसणे आणि तेथून काम करणे परवडणारे नाही. भारत सरकारला समस्येचे गांभीर्य समजले आहे आणि त्याद्वारे काही वाजवी निर्बधांसह लॉकडाउनमधून शेतीला मुक्त करण्याचे आदेश व मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्याच वेळी भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर) ने सुद्धा सरकारने जारी केलेल्या कठोर आरोग्य सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन करून कृषी कार्यात सुलभतेसाठी काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

भारतात सध्या कोविड–१९ संसर्गाच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने आणि ग्रामीण भागामध्ये प्रसार झाल्याने कृषी क्षेत्राची चिंता वाढली आहे. या कालावधीत, बहुतेक शेतकरी आगामी खरीप हंगामासाठी आपले शेत तयार करण्यासाठी अनेक कामे करतात. येत्या काही महिन्यांत भारतातील कोविड–१९ प्रकरणांच्या तीव्रतेबद्दलची विद्यमान परिस्थिति आणि उपलब्ध अंदाज खरीप २०२० मधील शेतीच्या कामाकाजास मोठे आव्हान दर्शविते ज्याचा देशाच्या अन्न सुरक्षेवर थेट परिणाम होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर, भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था, कटक ने देशातील तांदूळाच्या विविध भागधारकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कोविड–१९ वर एक विशेष नियमावली तयार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. तांदूळ लागवडीतील पीक उत्पादनासाठी लागवडीच्या वस्तू खरेदी करण्याच्या निर्णयापासून ते कापणीनंतरच्या कामकाजाचा विचार करून हे विशेष माहितीपत्रक तयार केले आहे. आम्हाला आशा की हे माहितीपत्रक राज्य सरकारे, कृषी विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिति आणि कृषि क्षेत्रात कार्यरत इतर संस्थासाठी कृषी मनुष्यबळाच्या संरक्षणासाठी कृतीशील मार्गदर्शक म्हणून काम करेल.

लेखक

अनुक्रमणिका

१.	शेतकऱ्यांसाठी नियमावली	०२
२.	निविष्ट विक्रेत्यांसाठी नियमावली	०५
३.	लॉजिस्टिक पार्टनर आणि कस्टम हायरिंग सेंटरसाठी नियमावली	०६
४.	कृषी कामगारांसाठी नियमावली	०८
५.	कृषी बाजारपेठेसाठी (कृषी उत्पन्न बाजार समिति) नियमावली	०९
६.	गांव पातळीवरील व्यापाऱ्यांसाठी नियमावली	११
७.	शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्यांसाठी नियमावली	१२
८.	किरकोळ विक्रेते आणि रेशन धान्य दुकानांसाठी नियमावली	१३
९.	तंत्रज्ञान विकासक आणि परीक्षकांसाठी नियमावली	१४
१०.	तंत्रज्ञान हस्तांतरणामध्ये समाविष्ट एजन्सींसाठी नियमावली	१६
११.	प्रवासासाठी नियमावली	१७
१२.	सर्वसाधारण उपाय	१८

परिचय

तांदूळाचे उत्पादन आणि पुरवठा करून अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी खरीप हंगाम महत्वाचे आहे. भारतामध्ये अन्नधान्याच्या वार्षिक धान्य साठ्यात सुमारे ८५ टक्के खरिपाचे उत्पादन आहे. हा हंगाम केवळ अन्नसुरक्षेच्या बाबतीतच महत्तवाचा नसून तो सामाजिक–आर्थिक विषमता कमी करण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. खरीप हंगाम प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या जमिनीत लागवड करण्याची संधी उपलब्ध करून देतो आणि उत्पन्न वाढवतो. तथापि, कोविड–१९ चा संसर्ग होण्याच्या भीतीमुळे सध्याची स्थिति ही विविध शेती व संबंधीत कार्यात मनुष्यबळाच्या गुंतवणूकीस संशयाची आहे. अशा प्रकारे लोकांच्या नकारात्मक भावनांचा आगामी काही महिन्यात कृषी क्षेत्रामधील कामगारांच्या सहभागावर परिणाम होऊ शकतो, तथापि शारीरिक अंतराचे निकष, श्वसनाचे स्वास्थ्य आणि हाताची स्वच्छता ही काही संभाव्य खबरदारी आहे जी शेतीतील कामकाज करतेवेळी कोविड–१९ ची जोखीम कमी करण्यास मदत करते.

कोविड–१९ महामारीच्या काळात भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था, कटक ने देशातील विविध तांदूळाच्या भागधारकांसाठी विशेष नियमावली तयार केली आहे. हा लेख विविध भागधारकांसाठी काय करावे आणि काय करू नये याची माहिती देतो आणि राज्य सरकारला येणाऱ्या काळात वेगवेगळ्या भांडवलदारांसाठी धानशेतीच्या वेगवेगळ्या कार्यामध्ये वेळेवर नियमावली जाहीर करण्यासाठी मार्गदर्शक सूचना म्हणून काम करेल. ही नियमावली राज्यांनी क्षेत्रानुसार पिके व त्यांच्या कामकाजाच्या संचालनावर आधारित कृषी विषयक नियमावलीसोबत एकत्र केले जाऊ शकते. या लेखामध्ये विविध स्त्रोत जसे की जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ), आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) व इतर संस्थांच्या कागदपत्रामधून माहिती गोळा करून नियमावली तयार केली आहे.

देशातील भात लागवड क्षेत्रातील लोकांसाठी ही नियमावली समर्पित केली आहे. ही माहितीपत्रिका तंत्रज्ञान विकासकांपासून ते तंत्रज्ञानाचा अवलंब करणारे आणि उत्पादनाच्या अंतिम विक्रीपर्यत सहाय्यक भागधारकांपर्यत वेगवेगळ्या भागधारकांसाठी दहा भागात विभागली आहे.

सार्स कोरोना व्हायरस–२ आणि कोविड–१९ बद्दल थोडक्यात माहिती

कोरोना व्हायरस हे व्हायरस कुटुंबाची एक मोठी प्रजाति आहे ज्यामुळे प्राणी किंवा मानवांमध्ये आजार उद्भवू शकतात. मानवांमध्ये, अनेक कोरोना विषाणूं सामान्य सर्दीपासून मिडल ईस्ट रेस्पिरेटरी सिंड्रोम (मर्स) आणि सेवेअर अक्यूट रेस्पिरेटरी सिंड्रोम (सार्स) सारख्या श्वसनाचे गंभीर संक्रमण होण्यास कारणीभूत ठरतात. अलीकडे सापडलेल्या कोरोना विषाणूने (सार्स कोरोना व्हायरस २) कोविड–१९ हा कोरोना–विषाणूचा आजार होतो.

कोविड–१९ ची सामान्य लक्षणे

कोविड–१९ वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळ्या प्रकारे प्रभावित करतो. बहुतेक संक्रमित लोकांना सौम्य ते मध्यम प्रमाणात आजार होतो आणि ते रुग्णालयात दाखल न करता बरे होतात.

सर्वात सामान्य लक्षणे

- ताप
- कोरडा खोकला
- थकवा

कमी समान्य लक्षणे

- ठणका व वेदना
- घसा खवखवणे
- अतिसार
- नेत्रश्लेष्मलाशोथ
- डोकेदुखी
- चव किंवा गंध कमी होणे
- त्वचेवर पुरळ येणे किंवा हाताच्या किंवा पायांच्या बोटांचा रंग नाहीसा होणे

गंभीर लक्षणे

- श्वास घेण्यास त्रास होणे
- छातीत दुखणे
- संभाषण न करणे किंवा तोंडाची हालचाल न होणे

कोविड–१९ ची सामान्य लक्षणे

यानंतरच्या विभागात भातशेतीच्या वेगवेगळ्या भागधारकांसाठी नियमावली तयार केली आहे.

ए) शेतकऱ्यांसाठी नियमावली

शेतकरी कोणत्याही अन्न शृंखलेचा प्रथम घटक आहे आणि ते शेतीची कामे पार पाडण्यासाठी इतर अनेक भागधारकांशी संवाद साधतात. ते बऱ्याच शेतमजुरांसाठी मालकही आहेत. म्हणूनच त्यांनी कर्तव्य बजावताना पुढील खबरदारी घ्यावी:

१. शेतकऱ्यांनी यांत्रिकीकृत शेती (स्वतःच्या किंवा जास्तीत जास्त भाडयाच्या यंत्राचा उपयोग करून) किंवा इतर मार्गाने शेतीमध्ये काम करणाऱ्या मजुरांची संख्या कमी करावी.

२. शेतात येतांना, शेतातून बाहेर जातांना आणि ठराविक वेळाने सर्व शेतमजुरांनी हात, पाय आणि चेहरा साबणाने किंवा सॅनिटाइझरने व्यवस्थित स्वच्छ करावेत.

३. शेतीच्या कामकाजादरम्यान चेहऱ्यावर मुखवटा घालणे अनिवार्य आहे. मुखवटा नसताना चेहरा तीन थराच्या

ओढणी, गमछा किंवा टॉवेलच्या कपड्याने झाकावा. कापड स्वच्छ आहे आणि इतरांनी तो वापरला नाही याची खात्री करावी.

४. शेतमजुरांनी शारिरीक अंतरावरील मार्गदर्शक सूचनांचे पालन केले पाहिजे (प्रत्येक व्यक्तीत कमीतकमी एक मीटर किंवा सहा फूट अंतर). बियाणे/रसायने खरेदी, जमीन तयार करणे, पीक व्यवस्थापन, कापणी आणि कापणीनंतरचे व्यवस्थापन यासह सर्व कामकाजाच्या वेळी स्वच्छता राखावी आणि मास्क घालावे.

५. शेतीची सर्व औजारे जसे की ट्रॅक्टर, पडलर, धान्य पेरण्याचे यंत्र, नांगर, ड्रम सीडर, कोनो–वीडर, कंबाइन हार्वेस्टर, लहान उपकरणे, कंटेनर, प्लास्टिकची चादरी/ट्रिपल, गस्त पिशव्या इत्यादी सर्व शेतीची औजारे प्रत्येक वापरापूवी सॅनिटाइझ करावीत. येथे, शेतात वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही यंत्रसामग्रीचे भाग (ट्रॅक्टरचे स्टीयरिंग व्हील सोडून) वापरण्यापूर्वी ७० प्रतिशतः अल्कोहोल किंवा साबणाच्या पाण्याने वापरण्यापूर्वी सॅनिटाइझ करावे. हे देखील सुनिश्चित करा की अशी स्वच्छता काम करण्यापूर्वी आणि काम झाल्यावर इंजिन थंड झाल्यावर पूर्ण केल्या पाहिजेत.

६. शक्य असेल तेथे मशीनीने काम करावे. केवळ आवश्यक व्यक्तींना किंवा मशीनला परवानगी दिली जावी.

७. पुन्हा वापरण्यासाठी बियाणे आणि खतांच्या रिकाम्या पिशव्या किमान दोन दिवस उन्हात वाळवाव्यात.

८. हाताने कापणी करतांना, प्रत्येक कामगाराकडे कापणीच्या वेळी स्वतःचा विळा असावा आणि वापरण्यापूर्वी तो स्वच्छ करावा व इतरांसह अदलाबदल करू नये.

९. एकत्र येणे टाळण्याकरिता जेवणाचा/चहाचा ब्रेक वेगवेगळ्या वेळी घ्यावा. जेवताना त्यांनी एकत्र जमू नये आणि सर्व कामात शारीरिक अंतर राखले पाहिजे.

१०. प्रत्येक कामगारांकडे खाण्यापिण्यासाठी स्वतंत्र भांडी असावीत आणि ती सामायिक केली जाऊ नये.

११. कामगारांनी हात योग्य प्रकारे धुतल्याशिवाय नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श करणे टाळावे.

१२. वापरलेला मास्क आणि कापड प्रत्येक उपयोगानंतर साबणाने स्वच्छ करून सूर्यप्रकाशात वाळविले पाहिजे.

१३. कामगारांनी वैयक्तिक स्वच्छता पाळली पाहिजे आणि कुठेही थुंकू नये.

१४. शेतकरी व इतर सहकाऱ्यांनी हात मिळविणे किंवा एकमेकांशी शारीरिक संपर्क/गळाभेट टाळायला हवा. त्याऐवजी ते नमस्कार करून पारंपारिक भारतीय परंपरेचा अनुसरण करू शकतात.

१५. एखाद्या व्यक्तीला खोकला, सर्दी, डोकेदुखी, ताप येत असेल तर त्या व्यक्तीने स्वतःला वेगळे ठेवावे आणि

कोणत्याही कामामध्ये भाग घेऊ नये. त्या व्यक्तीला जवळच्या रुग्णालयात / आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्याकडे नेले पाहिजे.

नमस्ते

१६. ज्या शेतकऱ्याने अलीकडील दिवसात बाधित भागात किंवा इतर राज्यांत/देशांत प्रवास केला आहे, त्यांनी शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वतःला अलगीकरणामध्ये ठेवायला पाहिजे.

१७. कोणताही प्रवासी मजूर जो बाधित भागातून आला असेल आणि त्याला शेतीचे काम असेल तर त्यांनी शासनाने दिलेले प्रमाणपत्र दिलेच पाहिजे की, त्यांनी अलगीकरणाच्या नियमाचे पालन केले आणि त्यांच्यात कोणतीही लक्षणे नाहीत. तथापि, बहुतांश ठिकाणी स्थानिक पातळीवर उपलब्ध मजुरांना प्राधान्य दिले पाहिजे.

१८. कामगार आजारी पडल्यावर मालकाला (शेतकरी) माहिती द्या जेणेकरुन ते वैद्यकीय मदत घेण्यासाठी परत पाठवू शकतील.

१९. जर शेतकरी कुटुंबातील एखादा सदस्य अलगीकरणामध्ये असेल तर त्या सदस्याला शेतीच्या कोणत्याही कार्यात गुंतले जाऊ नयेत.

२०. रोवणी, कापणी किंवा इतर कामकाज ज्यामध्ये अनेक मजुरांची आवश्यकता आहे, ते काम टप्प्याटप्प्याने केले पाहिजे. लगतच्या जमिनीत ३–४ दिवसांच्या अंतराने रोवणी केल्यास हे सुलभ होईल.

२१. शेतकऱ्यांनी नियमितपणे शेतीची इमारत, गोदाम, भांडारगृह फॉर्मल्डिहाइड ५ टक्के दराने निर्जंतुक करून स्वास्थ्य व स्वच्छता सुनिश्चित करावी.

२२. साठवण्यापूर्वी शेतकऱ्यांनी शेतातील उत्पादन ४८ तास उन्हात ठेवावे.

२३. शेतीचे यांत्रिकीकरण, थेट पेरणी (सीडड्रिल द्वारे पेरणी) आणि रासायनिक तण नियंत्रण ही विशेषतः उत्तर–पश्चिम राज्यांत स्थलांतरित कामगारांच्या कमतरतेमुळे काळाची गरज आहे. शेतात कामगारांची संख्या कमी करून कोविड–१९ चा प्रसार देखील रोखता येतो.

२४. रोवणी व कापणी या कामात अधिक मजुरांची आवश्यकता आहे, म्हणून शक्य असल्यास यंत्राने रोवणी व कापणी करा कारण त्यात शेतात कमी कामगार सामावून घेता येतात आणि शारीरिक अंतर ठेवणे सुलभ होते.

२५. जर कामगार रोवणी व कापणी हे काम करत असतील तर त्यांनी शारीरिक अंतर (दोन व्यक्ती मध्ये कमीतकमी १–२ मीटर अंतर), स्वच्छताविषयक आणि मुखवटा परिधान करण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना पाळल्या पाहिजेत. रोवणी करतांना प्रत्येक मजुराकडे रोपांचे वेगवेगळे बंडल असावे.

२६. नत्रःस्फुरदःपालाश ची प्रथम मात्रा (१/३ नत्र, स्फुरद आणि पालाश ची संपूर्ण मात्रा) सिंचन करतांना चिखलणीच्या आधी वापरली जाऊ शकते कारण अतिरिक्त कामगारांची आवश्यकता कमी होईल.

२७. तण व्यवस्थापनामध्ये सुद्धा अधिक कामगारांची आवश्यकता असल्यामुळे प्रतिबंधात्मक पद्धतीने (स्वच्छ बियाणे, उपकरणे, मशागत आणि २–सेमी पाण्याची पातळी राखणे) आणि तणनाशकाने (पीई–पेंडीमॅथॅलिन (थेट पेरणी केलेल्या जमिनीत), पीओई–बिस्पीरिबॅक–सोडियम (१०० मिली प्रती एकर)) कामगार कमी करता येतात.

बी) निविष्ट विक्रेत्यांसाठी सल्ला

शेतीमध्ये लागणाऱ्या साहित्यांचे विक्रेते जसे की बियाणे, कृषी रसायने, खते, हार्मोन्स, ग्रोथ प्रमोटर्स आणि कोनो–वीडर, फवारणी यंत्र इत्यादी सारख्या शेतीतील विविध साधनांचा व्यवहार करतात. या उत्पादनांच्या व्यवहारात, ते वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेल्या विविध प्रकारच्या लोकांच्या संपर्कात येतात आणि म्हणूनच ते कोविड–१९ च्या संसर्गाचा स्रोत ठरू शकतात. म्हणूनच, व्यवहार करताना त्यांना पुढील खबरदारी घ्यायला हवीः

१. दुकानात, खरेदीदार/साहित्य पुरवठा करणाऱ्याशी थेट संपर्क येऊ नये आणि दुकानातील वस्तूंना अनावश्यकपणे स्पर्श करू नये.

२. खरेदीदारांनी दुकानाच्या सभोवताल मोठ्या संख्येने जमा होऊ नये. म्हणजेच, त्यांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की, शारीरिक अंतराच्या सूचनांची कडक अंमलबजावणी होत आहे. या सोयीसाठी दुकानांचे मालक स्थानिक मागणीच्या अनुभवाच्या आधारे आवश्यक प्रमाणात किरकोळ (बियाणे, खते इ.) विकल्या जाणाऱ्या वस्तू बांधून ठेवू शकतात.

३. योग्य प्रमाणात श्वसनाचे स्वास्थ्य (मास्क वापरून), हाताची स्वच्छता (वारंवार हात धुणे, आवश्यक असल्यास सॅनिटाइझ करणे आणि हातमोजे वापरणे) व्यवस्थित ठेवणे योग्य आहे. तसेच मदतनीस मुलाला/पुरुषांना त्याचे अनुसरण करण्यास सांगा. दुकानांचे मालक दुकानातील कामगारांसाठी हात स्वच्छ करणारे सॅनिटाइझर ठेवू शकतात.

४. चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावेत आणि उन्हात वाळवावे.

५. गोदामांमध्ये कामगारांनी शारीरिक अंतर, श्वसनाचे स्वास्थ्य व हाताच्या स्वच्छतेची अमलबजावणी करावी. दुकान मालकांकडून नियमित दक्षता घेतल्यास कामगारांचा नकळत जवळचा संपर्क कमी होईल.

६. मालक त्यांच्या/तिच्या कामगाराला कामासाठी घर सोडण्यापूर्वी त्यांच्या आरोग्याच्या स्थितीबद्दल दूरध्वनीवर विचारू शकतात. जर कामगारात कोणतीही लक्षणे दिसली तर त्यांना पूर्णपणे बरे होईपर्यंत कामावर येण्यास प्रतिबंधित करायला हवे. अधिक लोकांचा समावेश असलेल्या दुकानांमध्ये, कामगार कामावर येत असताना ते आपल्या कामगारांवर नजर ठेवण्यासाठी थर्मल सेन्सरचा वापर करु शकतात.

७. दुकानात वापरलेली पेन वारंवार इतरांच्या हातात देऊ नये.

८. दुकान/गोदामांमध्ये काम करणाऱ्या लोकांचे कपडे स्वच्छ आहेत याची खात्री करुन घ्या.

९. सार्वजनिक ठिकाणी इकडेतिकडे थुंकणे टाळा. तंबाखू किंवा सतत थुंकण्याची गरज असलेल्या उत्पादनांना न खाण्याचा सल्ला दिला आहे.

१०. गाडीचे स्टिअरिंग, दरवाज्याचे हँडल, बाईकचे हँडल आणि चाबी बाजारात उपलब्ध असलेल्या सॅनिटाइझरने सॅनिटाइझ करावे.

११. डिजिटल पेमेंट पद्धतींचा (भीम, योनो, गूगल पे, पेटीएम इ.) वापर करावा.

१२. मधूनमधून हात धुणे आणि हात धुण्याशिवाय नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श करणे टाळा.

१३. आरोग्य सेतु ॲप वापरा.

आरोग्य सेतु

सी) लॉजिस्टिक पार्टनर आणि कस्टम हायरिंग सेंटरसाठी सल्ला

कस्टम हायरिंग सेंटर आणि लॉजिस्टिक पार्टनर हे जमीन तयार करण्यापासून ते उत्पादनांच्या विक्रीपर्यंत कृषी क्षेत्रात विविध प्रकारच्या कामाचा अपरिहार्य भाग आहेत. कस्टम हायरिंग सेंटर शेतीची विविध कामे करण्यासाठी कृषी यंत्र आणि उपकरणे उपलब्ध करुन देण्याच्या स्वरूपात शेती समुदायाच्या गरजेची पूर्तता करतात. तसेच

लॉजिस्टिक्स पार्टनर/रसद भागीदार उत्पादनास शेतातून बाजारात आणि किरकोळ विक्रेत्यांपर्यंत पोहोचविण्यात गुंतले आहेत. म्हणूनच, पुरवठा साखळीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी त्यांची सुरक्षा देखील महत्त्वपूर्ण आहे. कामाची आपूर्ति करतांना ते पुढील खबरदारी घेऊ शकतातः

१. मशीन ऑपरेटर, ड्रायव्हर्स आणि अन्य कामगारांनी श्वसनाचे स्वास्थ्य (मुखवटा वापरून), हाताची स्वच्छता (वारंवार हात धुणे, स्वच्छ करणे आणि आवश्यक असल्यास हातमोजे वापरणे) या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे देखील टाळावे.

Use net banking wherever possible

Use swap facility at marketplace

२. दिवसभर चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावेत आणि उन्हात वाळवावे.

डिजिटल पेमेंट पद्धतींचा (भीम, योनो, गूगल पे, पेटीएम इ.) वापर

३. कोणताही व्यवहार करताना ग्राहकांशी कमीत कमी एक मीटर अंतर ठेवा.

४. मोबाईल किंवा सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्म सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांशी थेट संपर्क साधने टाळावे.

५. डिजिटल पेमेंट पद्धतींचा (भीम, योनो, गूगल पे, पेटीएम इ.) वापर करावा.

६. वाहनचालकांनी नेहमीच स्वच्छ कपडे परिधान केले पाहिजे आणि चेहरा मास्कने झाकून ठेवावा.

७. वाहनचालकांना अल्कोहोल युक्त हँड सॅनिटायझर, जंतुनाशक, आणि कागदाचे टॉवेल्स दिले पाहिजेत.

८. वाहनचालकांनी वाहतुकीच्या अधिकाऱ्याकडे वाहनाची कागदपत्रे दाखवण्यापूर्वी किंवा बाजारातील कर्मचाऱ्याकडे कागदपत्रे दाखवण्यापूर्वी हँड सॅनिटाइझरने हात सॅनिटाइझ करावे.

९. हात लागणाऱ्या वस्तू जसे की वाहनाच्या दरवाजाची हँडल, स्टीयरिंग व्हील्स, मोबाइल इ. यांची वारंवार साफसफाई आणि निर्जंतुकीकरण करावे.

१०. एखादे वाहन कोविड–१९ च्या हॉटस्पॉट क्षेत्रात प्रवेश करत असल्यास, वापरण्यापूर्वी व नंतर वाहन पूर्णपणे स्वच्छ आणि निर्जंतुक केले पाहिजे. तथापि, इंजिन गरम असताना अल्कोहोलयुक्त सॅनिटाइझरचा वापर करणे टाळले पाहिजे. वाहनाची साफसफाई आणि स्वच्छता करण्याची नोंदवही (सॅनिटाइझेशन लॉग बुक) नेहमीच वाहनात उपलब्ध असणे आवश्यक आहे.

११. रसद भागीदारांनी (लॉजिस्टिक्स पार्टनर) हे सुनिश्चित केले पाहिजे की वाहन गर्दीच्या ठिकाणी उभे केले जाऊ नये.

१२. सर्व यंत्र/मशिन प्रवेश स्थानावर आणि नियमित अंतराने स्वच्छ केले जावेत. वाहतूकीची सर्व वाहने, पिशव्या किंवा इतर पॅकेजिंग सामग्री देखील सॅनिटाइझ केल्या पाहिजेत.

१३. ट्रॅक्टर/पॉवर टिलर आणि त्याच्या भागांची, फवारणी यंत्र, कुदळ, रिपर, कापणी यंत्र, मळणी यंत्र इत्यादीची योग्य प्रकारे सॅनिटाइझेशन आणि स्वच्छता करने आवश्यक आहे, विशेषतः जेव्हा शेतकरी यंत्र सामुदायिक वापरतात. वारंवार स्पर्श केलेले मशिनचे भाग साबणाने स्वच्छ करावे.

१४. आरोग्य सेतु ॲप वापरा.

१५. मधूनमधून हात धुवावे आणि हात धुतल्याशिवाय नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श करणे टाळावे.

डी) कृषी कामगारांसाठी नियमावली

मजूर हा शेतीचा अपरिहार्य घटक आहे. पूर्णपणे शेतीचे यांत्रिकीकरण करूनसुद्धा १०० प्रतिशत मनुष्यबळाचा वापर टाळू शकत नाही. त्याच वेळी, मजूर सर्वात असुरक्षित वर्ग आहेत आणि काही प्रकरणांमध्ये असे दिसून आले आहे की संसर्ग होण्याच्या भीतीने ते घराबाहेर पडण्यास टाळाटाळ करतात. तथापि, पुढील खबरदारी घेऊन, कोविड–१९ चा संसर्ग बऱ्यापैकी कमी केला जाऊ शकतोः

१. मजुरांनी घराबाहेर पडण्यापूर्वी याची खात्री करुन घ्यावी की त्यांना कोविड–१९ ची लक्षणे दर्शवीत नाहीत. जर त्यांना लक्षणे दिसून आली तर घरी अलिप्त राहावे किंवा डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

२. श्वसनाचे स्वास्थ्य (नाक आणि तोंड झाकण्यासाठी मास्क किंवा कोणत्याही स्वच्छ कपड्यांचा वापर), हाताची स्वच्छता (उपलब्ध असल्यास हातमोजे वापरणे किंवा साबणाच्या पाण्याने किंवा डिटर्जंटने वारंवार हात धुणे) यांच्या नियमांचे योग्य पालन करावे.

३. दिवसभर चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावेत आणि उन्हात वाळवावे.

४. मजुरांनी पाणी पिण्यापूर्वी व खाद्यपदार्थाचे सेवन करण्यापूर्वी आपले हात स्वच्छ केले पाहिजेत.

५. पिण्याच्या पाण्यासाठी सामुदायिकपणे पाण्याचे डबे किंवा बाटल्या आणणे टाळावे. त्याऐवजी प्रत्येकांनी पिण्याच्या पाण्याची वेगवेगळी स्वतंत्र व्यवस्था करावी.

६. शेतात किंवा कामाच्या ठिकाणी एकत्र जेवताना त्यांनी आपले हात स्वच्छ आहेत आणि ते एकमेकांपासून कमीतकमी एक मीटर अंतरावर बसले असल्याची खात्री केली पाहिजे. एकाच वेळी सर्वांना जेवणासाठी जागा पुरेशी नसल्यास वेगवेगळ्या वेळी जेवण करावे.

७. कामाच्या ठिकाणी शारीरिक अंतराचे पालन करणे अत्यंत महत्वाचे आहे आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळावे.

८. ज्या कामासाठी अधिक मजुरांची आवश्यकता आहे जसे की रोवणी आणि कापणी, त्यावेळी मजुर वेगवेगळ्या दिशेने काम करू शकतात. तसेच, कापणी / बांधणे सारख्या हाताने काम करण्याच्या कामात ४–५ फूट अंतरावरील पट्टे एका व्यक्तीस एक पट्टी वाटप करा जेणेकरुन ते शारीरिक अंतराच्या नियमाचे उल्लंघन करू शकणार नाही.

९. माल चढविणे आणि माल उतरवणे या कामात गुंतलेल्या कामगारांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की ते त्यांच्या परिवहनाच्या वेगवेगळ्या ठिकाणी अनावश्यक वस्तूंना स्पर्श करीत नाहीत. श्वसनाचे स्वास्थ्य (चेहऱ्यावर मास्क वापरून), हाताची स्वच्छता (हात धुणे आणि हातमोजे वापरणे) आणि शारीरिक अंतराच्या नियमांचे पालन केले पाहिजे.

१०. आरोग्य सेतु ॲप वापरा.

११. मधूनमधून हात धुवावे आणि हात धुतल्याशिवाय नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श करणे टाळावे.

इ) कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी (एपीएमसी) नियमावली

कृषी उत्पन्न बाजार समिती हे शेतकऱ्याकडून शेती उत्पादनांच्या विक्रीचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. बाजारपेठेत दररोज खरेदी–विक्रीच्या कामांमध्ये माल पुरवठा करणारे (शेतकरी, व्यापारी/धान्य व्यापारी, बाजारपेठेचे अधिकारी, प्रक्रिया करणारे इ), इतर सहायता करणारे (माल चढवणारे आणि उतरवणारे हमाल, वजन करणारे आणि इतर कामगार) ई–नाम, कॅन्टीन, पार्किंग सारख्या कामात मदत करणाऱ्या विविध भागधारकांचा सहभाग असतो. अशाप्रकारे, कृषी उत्पन्न बाजार समिती हे केंद्र आहे जे एकाच वेळी अनेक व्यक्तींना माल पुरवठ्यात गुंतवते. त्यामुळे बाजारपेठेत सुरक्षाविषयक कठोर उपाययोजना करावी. बाजारपेठेत पुढील खबरदारी घेतली जाऊ शकते:

१. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी टोकन द्यावे, जेणेकरून मंडीत गर्दी नियंत्रित करता येईल.

२. कोणत्याही अनधिकृत व्यक्तीचा प्रवेश टाळण्यासाठी प्रवेश / निकास द्वाराचे बारीक निरीक्षण करावे.

३. बाजारपेठेत प्रवेश करतांना शेतकरी / अधिकारी / कामगार / इतरांचे थर्मल स्कॅनिंग करावे.

४. बाजारपेठेत येणाऱ्या प्रत्येक प्रवेशकर्त्याची नोंद ठेवावी (नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक). कोणतीही संसर्गाची घटना आढळल्यास संपर्क शोधण्यास मदत करेल.

५. महत्वाची माहिती देण्यासाठी किंवा संवाद साधण्यासाठी उपलब्ध असल्यास सार्वजनिक माहिती प्रणाली / एलसीडी पडद्याचा वापर करावा.

६. बाजाराच्या मैदानात आणि बाजारपेठेत श्वसनाचे स्वास्थ्य, हाताची स्वच्छता आणि शारीरिक अंतराच्या नियमांचे पालन करावे.

७. दिवसभर चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावेत आणि उन्हात वाळवावे.

८. विक्री आणि खरेदीसाठी डिजिटल व्यवहार (पैशाचा थेट लाभार्थी) आणि ई–नाम चा उपयोग करावा.

९. बाजारपेठेत प्रवेशद्वारावर वाहनांची स्वच्छता करावी.

१०. बाजारपेठेच्या आवारांची नियमित साफसफाई करावी.

११. बाजारपेठेतील कर्मचारी आणि अधिकाऱ्याची नियमित आरोग्य तपासणी करावी.

१२. कोविड–१९ आणि त्यानंतरच्या चाचणीत कोणतीही लक्षणे आढळल्यास कामगारांना घरीच राहण्याची परवानगी देण्यात यावी.

१३. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळा.

१४. चहा / पानच्या दुकानांना तात्पुरते विस्थापित करून सभोवतालच्या गर्दीचे नियंत्रण करा.

१५. लघवी नंतर थुंकणे ही एक सामान्य पद्धत आहे म्हणून लोकांनी रस्त्याजवळ लघवी करू नये याची खात्री करुन घ्या.

१६. शौचालय स्वच्छ व व्यवस्थित ठेवावे.

१७. मालाचा वजन करणारे व्यक्ती, मजूर आणि इतरांनी वारंवार हात धुवावे आणि वापरण्यापूर्वी पृष्ठभाग वारंवार सॅनिटाइझ केले पाहिजेत.

१८. लोकांशी हात मिळवणे टाळा. त्याऐवजी शुभेच्छा देण्यासाठी नमस्तेच्या पारंपारिक मार्गाचे अनुसरण करा.

१९. वाहने किंवा त्याचे स्टिअरिंग / हॅण्डल / सीट वापरण्यापूर्वी सॅनिटाइझ करा.

२०. बाजारपेठेत आणि परिसरात अनावश्यकपणे थांबणे टाळा.

२१. आरोग्य सेतु ॲप वापरा.

२२. मधूनमधून हात धुवावे आणि हात धुतल्याशिवाय नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श करणे टाळावे.

एफ) गाव पातळीवरील व्यापार / प्रक्रिया एजन्सीसाठी नियमावली

नियमित बाजारपेठांमध्ये तांदळाच्या नियमित व्यापाराव्यतिरिक्त, व्यापारी व राज्य खरेदी संस्था देखील शेतकऱ्यांकडून धान खरेदीसाठी तळागाळातील पातळीवर काम करतात. म्हणून, अशा कामामध्ये सुरक्षिततेची देखभाल करणे खूप महत्वाचे आहे. राज्य सरकारच्या एजन्सी / व्यापाऱ्यांनी आपल्या लोकांची आणि शेतकऱ्यांची सुरक्षितता राखण्यासाठी पुढील सावधगिरी बाळगणे आवश्यक आहेः

१. राज्य खरेदी एजन्सींनी दररोज मर्यादित टोकन जारी करावीत जेणेकरून खरेदी केंद्रांमध्ये अनावश्यक गर्दी होऊ नये. यासाठी मोबाइल ॲप्सचा उपयोग करता येतो.

२. खाजगी व्यापाऱ्यांनी घरोघरी जाऊन उत्पादन उचलावे आणि शेतकऱ्यांना वेळेत पैसे द्यावे.

३. खरेदी एजन्सी आणि व्यापाऱ्यांनी त्यांना भेट दिलेल्या शेतकऱ्यांची किंवा त्यांनी भेट दिलेल्या शेतकऱ्यांची नोंद ठेवली पाहिजे.

४. श्वसनाचे स्वास्थ्य (नाक आणि तोंड झाकण्यासाठी मास्क किंवा कोणत्याही स्वच्छ कपड्यांचा वापर), हाताची स्वच्छता (उपलब्ध असल्यास हातचे हातमोजे वापरणे किंवा साबणाच्या पाण्याने किंवा डिटर्जंट्सने वारंवार हात धुणे) सारख्या योग्य स्वास्थ्याच्या नियमांचे पालन केले पाहिजे.

५. दिवसभर चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावे आणि उन्हात वाळवावे.



६. शारीरिक अंतरांच्या निकषांचे पालन करणे अनिवार्य आहे आणि त्यांनी याचीही काळजी घ्यावी की खरेदी केंद्रांवर निकषांचे काटेकोरपणे पालन केले आहे.

७. आरोग्य सेतु ॲप वापरण्याची शिफारस केली आहे.

८. वाहनांचे दरवाजे / हॅण्डल्स / स्टिअरिंग व्हील / सीट इत्यादीं वारंवार सॅनिटाइझ करावे.

९. सार्वजनिक ठिकाणी तंबाखू / पान खाणे आणि अनावश्यकपणे थुंकणे टाळावे.

१०. माल चढवणारे / उतरवणारे आणि वजन करणाऱ्या व्यक्तींनीही शारीरिक अंतर राखले पाहिजे. विश्रांती घेताना किंवा जेवताना दोन व्यक्तींमधील किमान एक मीटर किंवा सहा फूट अंतर राखणे बंधनकारक आहे.

११. व्यापाऱ्यांना कामावर येण्यापूर्वी कामगार व वाहनचालकांच्या आरोग्याची स्थिती विचारणे आवश्यक आहे. जर त्यांच्यात लक्षणे दिसून आली तर त्यांना विश्रांती घेण्याची आणि त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेण्याची परवानगी द्यावी.

१२. मधूनमधून हात धुणे आणि हात धुण्याशिवाय नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श न करणे बंधनकारक आहे.

जी) मालावर प्रक्रिया करणाऱ्यांसाठी नियमावली

प्रक्रिया करणे कोणत्याही अन्न मूल्य शृंखलेचे अपरिहार्य कार्य आहे ज्यासाठी वेगवेगळ्या व्यक्तींकडून वेगवेगळ्या कामाची आवश्यकता असते. प्रक्रियेच्या दृष्टीकोनातून, तांदूळ गिरणी, पीठ गिरणी, तांदूळ फ्लेक्स उत्पादन युनिट किंवा कोणतेही अन्य प्रोसेसिंग प्लांट महत्त्वपूर्ण आहेत. या प्रक्रिया करणाऱ्या युनिटनी खालील खबरदारीच्या उपाययोजना केल्या पाहिजेतः

१. प्रक्रिया घटकांनी त्यांच्या प्रवेश द्वारावर प्रवेश करणारांचे (कामगार, कच्चा माल पुरवठा करणारे, यांत्रिकी आणि इतर भागधारक) थर्मल स्कॅनिंग केले पाहिजे.

२. श्वसनाचे स्वास्थ्य (नाक आणि तोंड झाकण्यासाठी मास्क किंवा कोणत्याही स्वच्छ कपड्यांचा वापर), हाताची स्वच्छता (उपलब्ध असल्यास हातमोजे वापरणे किंवा साबणाच्या पाण्याने किंवा डिटर्जंटने वारंवार हात धुणे) सारख्या योग्य स्वास्थ्याच्या नियमांचे पालन करावे.

३. दिवसभर चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावे आणि उन्हात वाळवावे.

४. पूर्ण स्वच्छता झाल्यानंतरच कामगारांना कामाच्या मजल्यावरील किंवा कामाच्या ठिकाणी जाण्याची परवानगी द्यावी.

५. कोविड–१९ ची लक्षणे दिसल्यास कोणत्याही कामगारांना कामाच्या क्षेत्रात प्रवेश देऊ नये.

६. निरोगी खाद्य उत्पादनांच्या प्राथमिक तसेच माध्यमिक प्रक्रिया युनिटमध्ये कामगारांना स्वच्छता किट पुरविण्याची तरतूद करावी.

७. माल चढवणारे / उतरवणारे आणि वजन करणाऱ्या व्यक्तींनीही शारीरिक अंतर राखले पाहिजे. विश्रांती घेताना किंवा जेवताना दोन व्यक्तींमधील किमान एक मीटर किंवा सहा फूट अंतर राखणे बंधनकारक आहे.

८. वाहनांचे दरवाजे / हॅण्डल्स / स्टिअरिंग व्हील / सीट इत्यादींचे वारंवार स्वच्छता करावी.

९. सार्वजनिक ठिकाणी तंबाखू / पान खाणे आणि अनावश्यकपणे थुंकणे टाळा.

१०. आरोग्य सेतु ॲप वापरण्याची शिफारस केली जाते.

११. वाहन आणि वाहनांचे दरवाजे / हॅण्डल्स / स्टिअरिंग / सीट इत्यादींचे वापर करण्यापूर्वी सॅनिटाइझ करावे.

१२. मधूनमधून हात धुणे आणि हात धुतल्याशिवाय नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श करणे टाळावे.

एच) किरकोळ विक्रेते व रेशन दुकानांसाठी नियमावली

कोणत्याही वस्तूच्या मूल्य शृंखलामधील अंतिम वापरापूर्वी हे दोन स्थान अंतिम स्थळ आहेत. म्हणूनच हे स्थान लोकांचे वेगवेगळे ठिकाण, त्यांची पार्श्वभूमी आणि आरोग्याची परिस्थिती इत्यादीचे साक्षीदार आहे. म्हणूनच या ठिकाणी पुढील खबरदारी घ्यावी:

१. रेशन दुकानांनी अन्नधान्याच्या वितरणासाठी दररोज केवळ मर्यादित व्यक्तींची नावे नोंदवावीत आणि लाभार्थीला त्यांच्या येण्याची अंदाजे वेळ द्यावी जेणेकरुन त्यांना केंद्रावर प्रतीक्षा करण्याची गरज राहणार नाही.

२. रेशन दुकान / किरकोळ विक्रेत्यांच्या कामगारांनी अन्न वाटप करताना वारंवार त्यांचे हात सॅनिटाइझ करणे आवश्यक आहे. प्रत्येक विक्रीनंतर त्यांनी आपले हात सॅनिटाइझ केले तर ते योग्य ठरेल.

३. रेशन दुकाने किंवा किरकोळ दुकानात शारीरिक अंतराच्या निकषांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

४. श्वसन स्वच्छता (नाक आणि तोंड झाकण्यासाठी मास्क किंवा कोणत्याही स्वच्छ कपड्यांचा वापर) / हाताची स्वच्छता (उपलब्ध असल्यास हातमोजे वापरणे किंवा साबणाच्या पाण्याने किंवा डिटर्जंटने वारंवार हात धुणे) सारख्या योग्य स्वास्थ्याच्या नियमांचे पालन केले पाहिजे.

५. दिवसभर चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावेत आणि उन्हात वाळवावे.

६. रेशन दुकान मालक किंवा वितरकांनी कामावर येण्यापूर्वी त्यांच्या सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची स्थिती विचारणे आवश्यक आहे. जर त्यांना लक्षणे दिसून आली तर विश्रांती घेण्याची आणि त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेण्याची परवानगी द्यावी.

७. वाहनांचे दरवाजे / हॅण्डल्स / स्टिअरिंग / सीट इत्यादींचे वारंवार स्वच्छता करावी.

८. सार्वजनिक ठिकाणी तंबाखू / पान खाणे आणि अनावश्यकपणे थुंकणे टाळा.

९. आरोग्य सेतु ॲप वापरण्याची शिफारस केली आहे.

१०. रेशन लाभार्थींचा फोन नंबर रेशन दुकानांमध्ये नोंदविला गेला असेल तर रेशन गोळा करण्यासाठी त्यांच्या दिवस आणि अंदाजे वेळेविषयी संदेश पाठविला जाऊ शकतो.

११. रेशन दुकानांमध्ये प्रत्येक वापरानंतर पेन / इंकपॅड स्वच्छ करणे आवश्यक आहे.

१२. मधूनमधून हात धुणे आणि हात धुण्याशिवाय नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श करणे बंधनकारक आहे.

आय) तंत्रज्ञान विकासक आणि परीक्षकांसाठी नियमावली

राष्ट्रीय कृषी संशोधन आणि शिक्षण प्रणालीचे (एनएईआरईएस) वैज्ञानिक आणि तांत्रिक समुदाय, तंत्रज्ञान विकास आणि त्या क्षेत्रातील चाचणीमध्ये सामील असलेले महत्त्वपूर्ण भाग आहेत. त्यांनी त्यांच्या कामाच्या ठिकाणी पुढील सावधगिरी बाळगली पाहिजेः

१. श्वसनाचे स्वास्थ्य (नाक आणि तोंड झाकण्यासाठी मास्क किंवा कोणत्याही स्वच्छ कपड्यांचा वापर) / हाताची स्वच्छता (उपलब्ध असल्यास हातचे हातमोजे वापरणे किंवा साबणाच्या पाण्याने किंवा डिटर्जंट्सने वारंवार हात धुणे) सारख्या योग्य स्वास्थ्याच्या नियमांचे पालन केले पाहिजे.

२. दिवसभर चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावेत आणि उन्हात वाळवावे.

३. कार्यालयाच्या आवारात प्रवेश करण्यापूर्वी कार्यालय/कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची थर्मल स्कॅनिंग आणि सॅनिटाइझेशनची व्यवस्था सुनिश्चित करावी.

४. कार्यालयाने कर्मचारी सदस्यांसाठी आत व बाहेर पडायची वेगवेगळी वेळ पाळावी.

५. एका प्रवेश द्वारावर गर्दी होऊ नये म्हणून कार्यालयात अधिकाधिक प्रवेशद्वार तयार करावे.

६. शारीरिक अंतरांचे नियमही काटेकोरपणे पाळले पाहिजेत.

७. कार्यालयात इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा संचारणासाठी वापर करावा.

८. वैज्ञानिकांनी शेतात किंवा प्रयोगशाळेत कोणत्याही चाचण्या घेताना शारीरिक अंतर आणि श्वसन स्वच्छता आणि हात स्वच्छ ठेवण्याची खात्री केली पाहिजे.

९. प्रयोगशाळा व कार्यालयाच्या दारावरील हॅण्डल्सची दररोज स्वच्छता करावी.

१०. अधिकारी व त्यांचे अधीनस्थ कर्मचारी आरोग्य सेतु ॲप वापरत आहेत याची खात्री करुन घ्यावी.

११. कोविड–१९ ची कोणतीही लक्षणे दिसल्यावर घरीच राहून त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

१२. सार्वजनिक ठिकाणी तंबाखू / पान खाणे आणि अनावश्यकपणे थुंकणे टाळा.

१३. कार्यालयातील शौचालये दिवसातून किमान दोनदा स्वच्छ करावीत आणि प्रत्येक वापरकर्त्याने वॉश बेसिनमध्ये थुंकल्यास फ्लश करून ते वाहून जातील याची काळजी घ्यावी.

१४. कोणतेही तंत्रज्ञान / उत्पादन शास्त्रज्ञांनी किंवा त्यांच्या अधीनस्थांनी हाताळले असेल तर प्रत्येक उपयोगानंतर उत्पादनाच्या पृष्ठभागावर योग्यरित्या स्वच्छता करणे आवश्यक आहे.

१५. प्रयोगशाळेत ॲप्रॉन, हातमोजे, मास्क वगैरे वापरणे आवश्यक आहे आणि प्रयोगशाळेत वापरलेली उपकरणे किंवा त्यांचे पृष्ठभाग प्रत्येक उपयोगानंतर वारंवार स्वच्छ करावेत.

१६. तंत्रज्ञानाच्या चाचणीसाठी नवीन ठिकाणी (शेतकऱ्यांच्या शेतात) भेट देताना, श्वसन स्वच्छता, शारीरिक अंतर आणि हाताची स्वच्छतेचे नियम पाळावे.

१७. शेतातील डेटा गणकांनी उत्तर देणाऱ्यांशी सुरक्षित अंतर राखले पाहिजे आणि त्यांनी याची खात्री करुन घ्यावी की त्यांचे पेन किंवा सूची इतरांनी स्पर्श करू नये.

१८. कामाच्या ठिकाणी इतरांच्या आरोग्यावर परिणाम न करता वैयक्तिक स्वच्छता राखणे नेहमीच चांगले आहे.

आरोग्य सेतु

जे) तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणामध्ये समाविष्ट असलेल्या एजन्सींसाठी नियमावली

तंत्रज्ञान हस्तांतरणामध्ये राष्ट्रीय कृषी संशोधन आणि शिक्षण प्रणाली (एनएईआरईएस) अंतर्गत संशोधन संस्था व्यतिरिक्त कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके), राज्य कृषी विभाग, विविध जिल्हास्तरीय संस्था आणि स्वयंसेवी संस्था सहभागी आहेत. यासाठी त्यांनी तंत्रज्ञान उपभोगकर्त्यांपर्यंत किंवा स्वीकार करणाऱ्यांपर्यंत म्हणजेच मुख्यतः शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. म्हणूनच, तंत्रज्ञान हस्तांतरित करताना त्यांनी पुढील खबरदारी घेतली पाहिजेः

१. श्वसनाचे स्वास्थ्य (नाक आणि तोंड झाकण्यासाठी मास्क किंवा कोणत्याही स्वच्छ कपड्यांचा वापर), हाताची स्वच्छता (उपलब्ध असल्यास हातचे हातमोजे वापरणे किंवा साबणाच्या पाण्याने किंवा डिटर्जंटने वारंवार हात धुणे) सारख्या योग्य स्वास्थ्याच्या नियमांचे पालन केले पाहिजे.

२. दिवसभर चेहरा झाकण्यासाठी वापरलेले सर्व कपडे दुसऱ्या दिवशी वापरू नयेत. पुढच्या वेळी वापरण्यापूर्वी हे कपडे साबणाने स्वच्छ धुवावेत आणि उन्हात वाळवावे.

३. अधिकारी व त्यांचे अधीनस्थ कर्मचारी आरोग्य सेतु ॲप वापरत आहेत याची खात्री करुन घ्यावी.

४. तंत्रज्ञान निवेश (जसे की बियाणे, मशीन्स इ.) करतांना शारीरिक निकटता शक्य तितक्या टाळली पाहिजे हे लक्षात ठेवावे.

५. अधीनस्थ कर्मचाऱ्यांनी तंत्रज्ञानाच्या प्रत्येक वापरकर्त्यापर्यंत पोहोचल्यानंतर हातमोजे वापरायला हवे आणि हात धुवावेत.

६. प्रत्येक प्रवासापूर्वी वाहन सॅनिटाइझ केले जावे.

७. वाहनाच्या दरवाजाचे हँडल्स प्रत्येक स्पर्शाआधी सॅनिटाइझ केले पाहिजे.

८. वाहनचालकांना गर्दी नसलेल्या ठिकाणी गाडी पार्क करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

९. प्रात्यक्षिक ठिकाणी मोठ्या संख्येने जमा होण्यास काही वेळासाठी कमी केले पाहिजे आणि आवश्यक असलेल्या टप्प्यावर प्रात्यक्षिकांची काळजीपूर्वक व्हिडिओ/फोटो काढावेत जेणेकरुन स्थानिक माध्यम वाहिन्यांद्वारे किंवा वर्तमानपत्रांद्वारे प्रात्यक्षिकांविषयी जनजागृती होऊ शकेल.

१०. देशातील शेतात आणि दुर्गम भागातील (जसे की एआयसीआरपी निरीक्षण) दौऱ्यावर असलेल्या अधिकाऱ्यानी योग्य स्वच्छता पाळत असलेल्या ठिकाणीच राहणे व खाणे आवश्यक आहे आणि त्या ठिकाणी गर्दी करु नये.

११. तंत्रज्ञानाच्या प्रात्यक्षिकेसाठी वापरलेली उपकरण/साधने आवश्यकतेनुसार साबणाने पाण्याने स्वच्छ धुवावीत.

१२. काही काळ रेड झोनमध्ये कोणताही निवेश न करणे योग्य आहे व अधिकाऱ्यांनी ऑरेंज व रेड झोनमध्ये किंवा झोनमधून लांब पल्ल्याचा कोणताही प्रवास करू नये.

१३. एकाच ठिकाणी शारीरिक जमाव टाळण्यासाठी प्रशिक्षण आयोजित करतांना ऑनलाईन प्रशिक्षण पद्धतीचा वापर करा.

के) प्रवासासाठी नियमावली

प्रवासापूर्वी

१. आपली संस्था आणि त्यातील कर्मचाऱ्यांकडे कोविड–१९ पसरत असलेल्या भागाची नवीनतम माहिती असल्याची खात्री करा.

२. नवीनतम माहितीच्या आधारे, आपल्या संस्थेने आगामी प्रवासाच्या योजनांशी संबंधित फायदे आणि जोखमीचे मूल्यांकन केले पाहिजे.

३. कोविड–१९ पसरत असलेल्या ठिकाणी गंभीर आजाराचा धोका असलेल्या (उदा. वृद्ध कर्मचारी आणि मधुमेह, हृदय आणि फुफ्फुसाच्या आजारासारख्या) कर्मचाऱ्यांना पाठविणे टाळा.

४. कोविड–१९ ठिकाणांकडे जाणाऱ्या सर्व व्यक्तींना पात्र व्यावसायिक (उदा. कर्मचारी आरोग्य सेवा, आरोग्य सेवा प्रदाता किंवा स्थानिक सार्वजनिक आरोग्य कर्मचारी) यांनी माहिती दिली आहे याची खात्री करा.

५. प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अल्कोहोल–आधारित सॅनिटाइझरच्या छोट्या बाटल्या द्या.

प्रवासादरम्यान

१. कर्मचाऱ्यांना नियमितपणे हात धुण्यास प्रोत्साहित करा आणि खोकल्यामुळे किंवा शिंका येणाऱ्या लोकांपासून कमीतकमी एक मीटर दूर रहा.

२. प्रवास करताना कर्मचाऱ्यांनी आजारी पडल्यास काय करावे व कोणाशी संपर्क साधावा याची माहिती करुन घ्या.

३. खात्री करुन घ्या की तुमचे कर्मचारी स्थानिक अधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करतात आणि प्रवास, हालचाल किंवा प्रवास करत असलेल्या कोणत्याही मोठ्या संमेलनावरील स्थानिक निर्बंधांचे पालन करतात.

४. संपर्क केलेल्या आणि भेट दिलेल्या लोकांची नोंद ठेवा.

प्रवासानंतर

१. कोविड–१९ पसरत असलेल्या जागेतून परत आलेल्या कर्मचाऱ्यांनी १४ दिवस लक्षणांचे निरीक्षण करावे आणि दिवसातून दोनदा तपमान घ्यावा.

२. जर त्यांना अगदी सौम्य खोकला किंवा निम्न–स्तराचा ताप (उदा. ३७.३ से. किंवा त्याहून अधिक तापमान) असेल तर त्यांनी घरीच राहून स्वतः ला अलग केले पाहिजे. याचा अर्थ कुटुंबातील सदस्यांसह इतर लोकांशी जवळचा संपर्क (१ मीटरपेक्षा कमी अंतर) टाळावा. त्यांनी त्यांच्या आरोग्य सेवा प्रदात्यास किंवा स्थानिक सार्वजनिक आरोग्य विभागाला फोन करावा, त्यांना त्यांच्या अलीकडील प्रवासाचा आणि लक्षणांचा तपशील द्यावा.

एल) सर्वसाधारण उपाययोजना

1. कोविड–१९ चा संसर्ग झाल्याचा संशय असेल तर स्वतः ला इतरांपासून दूर ठेवा.

2. क्वारंटाईनच्या नियमाचे पालन करा.

3. डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि तपासणीसाठी जा.

एक मीटर किंवा सहा फूट शारीरिक अंतर ठेवा

रस्ता आणि बाजारपेठेत शारीरिक अंतर राखा

श्वसनाची स्वास्थ्यता राखा

ग्रामीण भागातील लोकांनी देखील सार्वजनिक ठिकाणी शारीरिक अंतराचे पालन केले पाहिजे

उपकरणांची अदलाबदल करणे टाळा किंवा वापरण्यापूर्वी पृष्ठभाग स्वच्छ करा

योग्य प्रकारे हात स्वच्छ करा आणि हाताची स्वच्छता राखा

बाजाराच्या किंवा कामाच्या ठिकाणी जमाव टाळा

शेतीची कामे करताना शारीरिक अंतराचे पालन करा

हातमोजे वापरा

शेतात दुपारच्या जेवणाच्या दरम्यान अंतर राखा

सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका

सार्वजनिक ठिकाणी लघवी करू नका

प्रवेश द्वारावर थर्मल स्कॅनिंग करा

नेहमी वाहन व त्याचे पृष्ठभाग (स्टीयरिंग व्हील, डोर हँडल्स इ.) सॅनिटाइझ करा



शक्य तेवढे डिजिटल व्यवहार करा

कामाच्या ठिकाणी शारीरिक अंतराचे पालन करा

वापर करण्यापूर्वी शेतीची उपकरणे सॅनिटाइझ करा

नेहमी आरोग्य सेतु ॲप वापरा

कंपन्या/व्यवसाय मालकांनी अभ्यागतांची नोंद ठेवली पाहिजे

बाजार/दुकाने/कार्यालय इत्यादी ठिकाणी जाताना वारंवार आपले हात स्वच्छ करा

शारीरिक निकटता टाळण्यासाठी आयसीटी चा वापरा करा

पेन किंवा लेखन सामग्री बाजारपेठ/दुकाने/कार्यालय सारख्या सार्वजनिक ठिकाणी सामायिक करणे टाळा

वापरण्यापूर्वी वाहन/कार्यालय/कार्यस्थळाच्या दाराचे हँडल्स स्वच्छ करा

केवळ नियुक्त ठिकाणी वाहने पार्क करा आणि गर्दीच्या ठिकाणी पार्किंग करणे टाळा

एकमेकांना अभिवादन करण्याचा पारंपारिक भारतीय मार्गाचा अनुसरण करा

खोकताना किंवा शिंकताना नेहमीच आपले तोंड झाकून ठेवा

कोणतीही लक्षणे दाखवल्यानंतर त्वरित डॉक्टरांशी संपर्क करा

भाकृसंप–राष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था
(आय एस ओ ९००१: २०१५ प्रमाणित संस्था)
कटक–७५३००६, ओडिशा

Phone: 91-671-2367757, Fax: 91-671-2367663
Email: director.nrri@icar.gov.in | directorcrricuttack@gmail.com
Website: http://www.icar-nrri.in